# जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव

आकाशवाणी केंद्राजवळ ता. जि. जळगाव, पिन कोड ४२५००१.
(महसूल शाखा)
दुरध्वनी क्र. ०२५७-२२२४१४१ फॅक्स क्र. ०२५७-२२२०५०० ई-मेल :- rev.jalgaon@gmail.com

क्र. जमीन/२/२६/२०२०/३३/७०/३५. दिनांक १५/०१/२०२०

**परिपत्रक**

जळगाव जिल्ह्यातील जिल्हा व सत्र न्यायालय, जळगाव तसेच, भुसावळ, अमळनेर, चाळीसगाव येथील अतिरिक्त जिल्हा सत्र न्यायालय आणि तालुक्यांतील दिवाणी व फौजदारी न्यायालयांमध्ये विविध प्रकारचे महसूल विषयक दावे दाखल असतात. या न्यायालयांत महसूल विषयक दाखल विविध दाव्यांमध्ये वेळच्या वेळी परिच्छेदनिहाय अभिप्राय आणि प्रतिज्ञापत्र दाखल केले जात नाही. तसेच, संबधित न्यायालयात प्रकरणपरत्वे नेमुन देण्यात आलेल्या तारखांना महसूल अधिकारी यांची अनुपस्थिती असते. माझ्या असे निदर्शनास आणून देण्यात आलेले आहे की, बऱ्याच वेळा मा. न्यायालयात नायब तहसिलदार (वर्ग-२) दर्जापेक्षा कनिष्ठ संवर्गातील कर्मचारी यांना (मंडळ अधिकारी, अव्वल कारकुन) आपले वतीने परिच्छेदनिहाय अभिप्राय आणि प्रतिज्ञापत्र दाखल करणेच्या कामकाजासाठी प्राधिकृत केले जाते आणि तारखांना उपस्थित राहणेच्या सुचना देण्यात येतात. तसेच, दाव्याचे संबंधित सरकारी वकीलांशी देखील महसूल अधिकारी यांचेकडुन वेळेत संपर्क साधला जात नाही. यामुळे पर्यायाने प्रकरणी विलंब होऊन मा. न्यायाधिश यांना अंतिम न्यायनिर्णय निर्गमित करणेस अडचणी येतात.

यासंदर्भात मा. जिल्हा व सत्र न्यायाधिश, जळगाव यांनी निम्नस्वाक्षरीतांकडेस तिव्र शब्दांत नाराजी व्यक्त केलेली आहे. यामुळे महसूल प्रशासनाची प्रतिमा मा. न्यायालयात आणि साहजीकच सामान्य जनमानसांत मलीन होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर बाब प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीकोनातुन देखील निश्चितच योग्य नाही.

यास्तव खालील सर्व सुचनांचे काटेकोरपणे पालन करणेची दक्षता घ्यावी.

१) दिवाणी व फौजदारी न्यायालयांमध्ये दाखल विविध महसूल विषयक दाव्यांमध्ये संबंधित सरकारी वकीलांशी संपर्क साधून मुदतीत परिच्छेदनिहाय अभिप्राय आणि प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात यावे.

२) कोणत्याही परिस्थितीत नायब तहसिलदार (वर्ग-२) दर्जापेक्षा कनिष्ठ संवर्गातील कर्मचारी यांना मा. न्यायालयात परिच्छेदनिहाय अभिप्राय आणि प्रतिज्ञापत्र दाखल करणेकामी प्राधिकृत करु नये.

३) सरकारी वकीलांचे सल्ल्यानुसार वेळोवेळी आवश्यक असणारे कागदपत्र पुरविणेत यावेत.

सदर परिपत्रक माझे सहि शिक्क्यानिशी आज दि. १५ /०१/२०२० रोजी निर्गमित करण्यात आलेले आहे.

COLLECTOR JALGAON
जिल्हाधिकारी जळगाव

(डॉ. अविनाश ढाकणे)
जिल्हाधिकारी जळगाव

प्रति,
उपविभागीय अधिकारी (सर्व) जिल्हा जळगाव.
कार्यालय / शाखा प्रमुख (सर्व), जिल्हाधिकारी कार्यालय, जळगाव.
तहसिलदार (सर्व) जिल्हा जळगाव.
प्रत:- जिल्हा सरकारी वकील, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगाव यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.